19-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 18-05-2025 22:03 Page 1



सावर्डे ग्रामसभेत बंधारा वाद पेटला

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



पंजाबचा राजस्थानवर दणदणीत विजय

पान ४ वर

वेर्णा, सोमवार, १९ मे २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 256 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 19 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# पर्वरी उड्डाणपुलाचा स्लॅब कोसळल्याने चार जण जखमी

## कामाच्या दर्जाबाबत नागरिकांनी व्यक्त केली चिंता

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ३ : पर्वरीतील उड्डाणपुलाच्या कामावेळी रविवारी दुपारी सुमारे १ वाजता गंभीर अपघात झाला. पुलाच्या दोन खांबांदरम्यान स्लॅबचे एक सेगमेंट चढवले जात असताना अचानक कोसळल्याने चार जण जखमी झाले. सुदैवाने, मोठी जीवितहानी टळली.**

प्राप्त प्राथमिक माहितीनुसार, गिरी ते पर्वरीदरम्यान उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामात वेग आला असून, रविवारी या पुलावर स्लॅब टाकण्याचे काम सुरू असताना क्रेनचा शाफ्ट अचानक तुटला आणि स्लॅबचा मोठा भाग खाली कोसळला. या अपघातामुळे पुलाच्या दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या वाहतुकीला मोठा फटका बसला.

या घटनेच्या वेळी अपघातस्थळी असलेल्या एका स्थानिक युवकाच्या दुचाकीवर तुटलेल्या शाफ्टचा काही भाग आदळला. त्यामुळे त्या युवकाच्या पायाला जखम झाली असून त्याच्या दुचाकीचेही नुकसान झाले आहे. अन्य तीन जखमींबाबतही प्राथमिक उपचार करण्यात आले असून सध्या सर्वांची प्रकृती स्थिर आहे. अपघात ज्या ठिकाणी झाला, त्याच्या अगदी शेजारी या युवकाचे एक दुचाकी दुरुस्तीचे गॅरेज आहे. संबंधित युवक आपल्या गॅरेजमध्ये असताना ही दुर्घटना घडली. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पुलाच्या कामाचा दर्जा समाधानकारक नसून, घाईगडबडीने व दृष्टीआड पद्धतीने काम चालू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा अपघात नेमका तांत्रिक बिघाडामुळे झाला की अन्य कोणत्याही कारणामुळे, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, नागरिकांनी कंत्राटदार कंपनीच्या कार्यपद्धतीवर तसेच प्रशासनाच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.गेल्या काही महिन्यांपासून पुलाचे सेगमेंट टाकण्याचे काम सुरू असून आतापर्यंत २१ हून अधिक स्लॅब यशस्वीरित्या बसवले गेले आहेत.

पान २ ▶





# चारमिनारजवळ भीषण आग; १७ जणांचा मृत्यू

**हैदराबाद, दि. १८ :**

चारमिनार परिसरातील गुलजार हाऊस या बहुमजली इमारतीत गुरुवारी सकाळी लागलेल्या भीषण आगीत १७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, मृतांमध्ये ८ लहान मुलांचाही समावेश आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

तेलंगणा अग्निशमन, आपत्ती प्रतिसाद व नागरी संरक्षण विभागाने या घटनेची अधिकृत पुष्टी केली आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी साडेसहाच्या सुमारास आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. गंभीर अवस्थेत असलेल्या अनेक नागरिकांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.पंतप्रधान कार्यालयाने ’एक्स’ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून शोकसंवेदना व्यक्त करताना, मृतांच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची मदत जाहीर केली आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या आहेत. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री भट्टी विक्रममार्क मल्लू यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येकाच्या कुटुंबाला राज्य सरकारकडून ५ लाख रुपयांची मदत दिली जाईल. तसेच, जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकार उचलेल. या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू असून, संबंधित अधिकाऱ्यांकडून घटनास्थळी पाहणी केली जात आहे.

# महामार्गावर धातूचे गोळे वेचण्यासाठी नागरिकांची झुंबड

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. १८ :** नुवे येथील राष्ट्रीय महामार्गावर रविवारी सकाळी एकच गोंधळ उडाला. या महामार्गावरून जाणारा प्रत्येक वाहनचालक आपले वाहन थांबवून रस्त्यावर पडलेले छोटे छोटे धातूचे गोळे वेचू लागला. महामार्गावर सांडलेले गोळे फार किमती आहेत अशी अफवा वेगाने पसरताच हे गोळे वेचण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली. यामुळे काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला.



प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कोणतीही पूर्वसूचना नसताना महामार्गावर लहान, चमकदार धातूचे गोळे विखुरलेले दिसून आले. त्यानंतर काही मिनिटांतच रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाहने थांबवून लोकांनी आपल्या हातांनी, प्लास्टिकच्या पिशव्या आणि अगदी हेल्मेट वापरूनही गोळे वेचण्यास सुरुवात केली. क्षणात वातावरणात गोंधळ निर्माण झाला. अनेक जण आपल्या गाड्यांमधून झपाट्याने बाहेर पडले. काहींनी तर वाहतूक थांबवून शक्य तितके गोळे वेचण्याचा प्रयत्न केला, असे प्रत्यक्षदर्शी प्रवासी राजीव नाईक यांनी सांगितले. या अनपेक्षित प्रकारामुळे दोन्ही बाजूंना वाहतुकीची कोंडी झाली. काही वाहने रस्त्याच्या मध्यभागी अडकून पडली, तर काही चालकांनी गोंधळ टाळण्याचा प्रयत्न करताना अपघात टाळले.

या गोळ्यांबाबत नागरिकांत विविध तर्क लावले जात होते. काहींनी त्यांना मौल्यवान धातूपासून बनलेले असल्याचे मानले, तर काहींनी ते चुंबकीय असल्याचे सांगत औद्योगिक उपयोगाचे असल्याचा अंदाज व्यक्त केला. घटनेनंतर काही वेळातच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गर्दी हटवून वाहतुकीचा प्रवाह सुरळीत करण्यास सुरुवात केली. प्राथमिक तपासात या गोळ्यांचा स्त्रोत एखाद्या मालवाहू ट्रकमधून असावयाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

पान २ ▶

















ऑफर्स 31 मे, 2025 पर्यंतच वैध.*
Hyundai EXTER आणि Grand i10 NIOS मध्ये Hy-CNG Duo उपलब्ध. स्पेसही. मायलेजही.
##डिपॉझिटचे वैध प्रमाणपत्र दाखवल्यास अतिरिक्त स्क्रॅपेज बोनस उपलब्ध.
#CSD आणि KPKB ग्राहकांसाठी अतिरिक्त लाभ.

HYUNDAI

Hyundai Cl!ck to Buy Scan here | 3 YEAR Unlimited** Kilometer Warranty, Up to 7 years extended warranty^ | 3 YEAR Road Side Assistance(RSA)*** | UP TO 5 YEAR Shield of Trust Service Packages~ | Hy-CNG Duo

**For Information Contact:** Toll Free: 1800114645 **Porvorim:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Margao:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Verna:** Goa Hyundai, Ph: 6699999, 9822131489 **Tivim:** Goa Hyundai, Ph: 8390965558 **Ponda:** Goa Hyundai, Ph: 2313375, 9822588861

my Hyundai app

Hyundai Promise Certified Pre-Owned Car

Scan to chat with us or give a missed call at 9555295868

*Terms & Conditions apply. For more details, visit your nearest Hyundai showroom. Benefits mentioned include cash, corporate, either exchange or scrappage benefits as applicable. Benefits mentioned may vary from city to city. ##Scrappage bonus will be available against a valid certificate of deposit (issued by government approved and operational scrappage center) and exchange of old car. In case the customer is giving certificate of deposit but not physically exchanging his old car and buying a new car - then only scrappage bonus of ₹ 5 000 will be paid. Benefits may vary with variants. **3-year warranty or upto 100 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N Line. 3-year unlimited km warranty is applicable for EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric, ALCAZAR, TUCSON, VERNA and IONIQ 5. ^Upto 7 Years extended warranty is available for Grand i10 NIOS, i20, i20 N Line, AURA, VERNA, EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric, ALCAZAR & TUCSON in all variants (Petrol/Diesel/CNG) and subject to payment. ***3 years Roadside Assistance (with taxi support & introduction of 10 year retail program). ~For detailed T&C of RSA, Shield of Trust & Super, kindly visit Hyundai India website. This advertisement and car shown here is for creative representation purposes only and the depictions are for illustrative purposes. Features and specifications shown may vary or may not be a part of standard fitment and are subject to change without prior notice. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour, equipment and schemes at any time without prior notice. The black shade on glasses are due to lighting effect. Size and colour may appear to vary due to lighting and position effect. Extended Warranty and Shield of Trust & Super are on payable basis. For more details on warranty, please refer owners' manual, #CSD: Canteen Stores Department, KPKB: Kendriya Police Kalyan Bhandar. INNOCEAN-031/25 MAR